दैनिक


# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 3 एप्रिल 2026 | अंक क्र. 314 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com







## परळी तहसील प्रशासन झोपलेले आहे की झोपेचे सोंग घेत आहे

# जन्म प्रमाणपत्रासाठी नागरिकांना 6 महिने 'वेटिंग'!

### प्रशासन सुस्त, जनता त्रस्त; जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालण्याची मागणी

**परळी प्रतिनिधी**

**परळी तहसील कार्यालयाचा कारभार सध्या कमालीचा चर्चेत आला असून, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे सामान्य नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. नियमानुसार ४५ ते ६० दिवसांत मिळणारे जन्म प्रमाणपत्र तब्बल सहा महिने उलटूनही मिळत नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तहसील प्रशासनाच्या या 'कासवगती' कारभारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

#### नेमकी अडचण काय?

■ गेल्या सहा महिन्यांपासून शेकडो नागरिकांनी जन्म प्रमाणपत्रासाठी रीतसर अर्ज केले आहेत. मात्र, या अर्जांवर अद्याप कोणतीही अंतिम ऑर्डर काढण्यात आलेली नाही. नागरिक वारंवार कार्यालयाच्या चकरा मारत आहेत, पण त्यांना समाधानकारक उत्तर देण्याऐवजी केवळ टाळाटाळ केली जात आहे.

#### "ना त्रुटी सांगितली जाते, ना प्रमाणपत्र दिले जाते"

■ नागरिकांचा असा आरोप आहे की, जर अर्जात काही तांत्रिक त्रुटी असतील तर त्या स्पष्टपणे सांगितल्या जात नाहीत. त्रुटी समजल्या तर नागरिक त्या दुरुस्त करतील, पण अधिकारी या विषयाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे.




#### अधिकारी मागील प्रकरणांतून धडा घेणार का?

**मागच्या वर्षी जन्म प्रमाणपत्राच्या प्रकरणात मोठी अनियमितता समोर आली होती. खोटी माहिती देणाऱ्या सुमारे ४० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या कारवाईनंतर प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि वेग येईल अशी अपेक्षा होती, मात्र परिस्थिती तशीच राहिली आहे. जुन्या चुका सुधारण्याऐवजी नवीन अर्जदारांना वेठीस धरण्याचे काम सध्या सुरू असल्याचे बोलले जात आहे. सहा महिन्यांपासून रखडलेले अर्ज तात्काळ निकाली काढावेत. पारदर्शकता आणा अर्जात त्रुटी असल्यास ती लेखी स्वरूपात कळवावी. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आणि अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी. अशी मागणी नागरिक करत आहेत. परळी तहसील कार्यालयाच्या या दिरंगाईमुळे सामान्य माणसाचे शैक्षणिक आणि शासकीय कामे खोळंबली आहेत. तहसील प्रशासनाने आपली झोप झटकून तातडीने कार्यवाही न केल्यास, संतप्त नागरिकांनी आता आंदोलनाचा पवित्रा घेण्याचा इशारा दिला आहे. आता या प्रकरणात बीड जिल्हाधिकारी स्वतः लक्ष घालून परळीकरांना दिलासा देणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

**जुन्या चुका सुधारण्याऐवजी नवीन अर्जदारांना वेठीस धरण्याचे काम सध्या सुरु असल्याचे बोलले जात आहे.**




## नवनिर्वाचित पोलीस युवकांचा पै.सतीश शिंदेंकडून सत्कार!

**आष्टी | प्रतिनिधी**

आई-वडिलांचे स्वप्न उराशी बाळगून जेव्हा युवक आपलं भविष्य घडण्यासाठी धावपळ करतात त्यावेळी त्यांना पाठबळ देणं कर्तव्य असतं त्याच पद्धतीने युवक यशस्वी झाल्यावर त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप ही तितकीच महत्त्वाची असते. कोणत्याही क्षेत्रात युवकांनी यश संपादन केलं तर त्यांच्या पाठीवर नेहमीच कौतुकाची थाप देणारे सतीश शिंदे यांनीही आज नऊ नवनिर्वाचित पोलीस युवक यांना सन्मानित करून कौतुकाची थांब दिल्याने युवकांनाही पाठबळ मिळाला आहे..

जय हनुमान तालीम येथे नवनिर्वाचित पोलीस झालेल्या युवकांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांनी आयोजित केला होता यामध्ये नऊ नवनिर्वाचित पोलीस युवकांचा सन्मान करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे. आई-वडिलांचा स्वप्न साक्षात उतरवणारे हे युवक भविष्यकाळात त्यांच्या हातून समाजाची सेवा घडावी हीच अपेक्षा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांनी यावेळी व्यक्त करून

## रस्त्यावर वाढदिवस साजरे करणाऱ्यांवर पोलीसांची कडक कारवाई; अंबाजोगाई शहर पोलीसांचे नागरिकांना आवाहन

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

अंबाजोगाई शहरातील काही टवाळखोर मुलांचे टोळके पोलीस यंत्रेने वारंवार आवाहन करून ही रस्त्यावर फटाके, तोफा वाजवून वाढदिवस साजरा करत असल्याच्या तक्रारी पोलिसात प्राप्त झाल्या असून मागील 3 दिवसात दोन ठिकाणी साजरा केलेल्या वाढदिवसानंतर संबंधित मुलावर रीतसर कार्यवाही करण्यात आल्या नंतर अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी अशा टवालखोर मुलावर गुन्हा दाखल करण्याचा इशारा देऊन असे वाढदिवस साजरा करणारांचे फोटो पाठवण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे.

या पूर्वी अंबाजोगाई पोलिसांच्या आवाहना नंतर शहरामध्ये रस्त्यावर वाढदिवस साजरे करण्याचे प्रमाण कमी झाले होते मात्र मागील काही दिवसा पासून ते पुंन्हा वाढले आसुन वाढदिवस साजरा करताना मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले



जातात, ज्यामुळे सामान्य नागरिकांना त्रास होतो. वाढदिवस साजरा करताना अनेक वेळा आपसात भांडणे होतात व यापूर्वी बीड येथे एका युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडलेली आहे. मागील तीन दिवसांत वाढदिवस साजरा केलेल्या दोन प्रकरणांमध्ये संबंधित मुलांना पोलीस स्टेशनमध्ये आणून कारवाई करण्यात आलेली आसुन यापुढेही अशी कारवाई सतत सुरू राहणार आहे.

रस्त्यावर साजरे होतं असलेले वाढते वाढदिवस पाहता अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी अशा टवाळखोर मुलांना आवाहनाच्या माध्यमातून एक प्रकारे तंबी दिली आहे. यापुढे जर कोणी रस्त्यावर वाढदिवस साजरा करताना व फटाके वाजवताना आढळून आले, तर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील. ज्या ठिकाणी असे वाढदिवस साजरे करण्याचे प्रकार आढळून येतील, त्या भागातील नागरिकांनी वाढदिवस साजरा करणाऱ्या व्यक्तींचे फोटो मोटारसायकल / चारचाकी वाहनांचे नंबर प्लेटचे फोटो आदी माहिती 9225092823 या संपर्क क्रमांका वर कळवून सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी नागरीकांना केले आहे.

## चमत्कार दाखवण्याच्या बहाण्याने वृद्धाची अंगठी चोरी; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई "चमत्कार दाखवतो"

**केज (बीड) :**

चमत्कार दाखवण्याचा बहाणा करून एका वृद्धाची सोन्याची अंगठी लंपास करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. या कारवाईमुळे अशा प्रकारे फसवणूक करणाऱ्या टोळ्यांचा पर्दाफाश झाला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी भीमा सोनाजी जाधवर (वय 58, रा. काशीवाडी, ता. केज) हे उपचारासाठी पुण्याकडे जाण्यासाठी केज बसस्थानकावर थांबले होते. यावेळी दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना "चमत्कार दाखवतो" असे सांगून बोलण्यात गुंतवले. त्यांनी फिर्यादीकडील सुमारे 6 ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी काढून घेतली व "10 मिनिटांनी चमत्कार दिसेल" असे सांगून तेथून पसार झाले. घटनेची तक्रार नोंद झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयित आरोपींचा माग काढण्यात आला. तपासादरम्यान आरोपी अमजद नवाब मदारी (रा. सावरगाव, ता. येवला, जि. नाशिक) याला ताब्यात घेण्यात



आले. चौकशीत त्याने साथीदार अशफाक राजू मदारी यांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली. पोलीसांनी आरोपीकडून चोरीस गेलेली अंगठी (किंमत अंदाजे 24 हजार रुपये) तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त केली आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास केज पोलिस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बेंडेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. दरम्यान, केज बसस्थानक परिसरात यापूर्वीही अशाच प्रकारे प्रवाशांची फसवणूक करून दागिने चोरी केल्याच्या घटना घडल्या आहेत, त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## मानवतावादी विचारवन्त डॉ.म.सु.पगारे यांचे ग्रंथदान

**बहाळ प्रतिनिधी**

मोबाईल या घटकामुळे विद्यार्थी वर्ग वाचनापासून लांब चाललाय. वाचन संस्कृतीने अनेक विदवत व प्रज्ञावन्त समाजाला दिले असून त्यामुळे समाज सुजाण व सजग झाल्याचे सर्वश्रुत आहे.मोबाईलच्या विळख्यात अडकलेल्या वर्तमान पिढीतल्या तरुणांमध्ये वाचनाभिरुची रुजू करावी या दुरदृष्टीतून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक तथा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रोफेसर डॉ.म.सु.पगारे यांनी बहाळ ता.चाळीसगाव येथील साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयास ८६००० रुपये किमतीची ३८१ वैविध्यपूर्ण पुस्तके ग्रंथदानाच्या माध्यमातून काल दि.३१.३.२०२६ रोजी वाचनालयाचे अध्यक्ष श्री.शिवराम चौधरी यांना सुपूर्त केलीत.यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष श्री.भीमराव बोरसे ,सचिव पी.एस.करंकाळ, दुय्यम सचिव श्री.संतोष भोई यांचेसह संचालक मंडळाची उपस्थिती होती.

डॉ.पगारे यांचे माध्यमिक शिक्षण बहाळ येथे झाले असल्याने गावाचे मी देणे लागतो.या कृतज्ञ भावनेने वर्तमान पिढीसाठी व येणाऱ्या पिढ्यांसाठी केलेले हे विपुल ग्रंथदान गावकऱ्यांना भारावणारे होते. स्वतः डॉ.म.सु.पगारे हे सिद्धहस्त लेखक,समीक्षक,संशोधक,कवी तथा द्रष्टे वक्ता म्हणून महाराष्ट्रास परिचित आहेत.त्यांनी आजवर साठ ग्रंथांचे लेखन केले असून अनेक विद्यापीठात त्यांच्या ग्रंथांवर पीएच.डी सुद्धा झालीय.इटली,व्हेनिस,मलेशिया,दुबई,पुणे येथे संपन्न झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.त्यांच्या बा, तथागता या विशाल मराठी कवितेची हिंदी,इंग्रजी व अहिराणी भाषेत अनुवाद झाले असून त्यावरचे समीक्षा ग्रंथही प्रकाशित झाले आहेत. एका ज्ञान तपस्व्याने ऋणाईत होऊन आपल्या गावाला दिलेले हे ग्रंथदान अखिल मानवतेला गवसणी घालणारे असून बहाळ येथील ग्रामस्थ आणि साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयाच्या संचालक मंडळाने याबद्दल आनंद आणि समाधान व्यक्त केलेय. यावेळी एरंडोल येथील साहित्यिक विलास मोरे,संशोधक विद्यार्थी कैलास पाटील, संशोधक विद्यार्थी अस्मादिक पगारे यांचीही उपस्थिती लाभली.





# श्रीकृष्ण ढाकणे व गोविंद ढाकणे हे अस्वलअंबा गावासाठी लाभलेले एक परीस

**हनुमान जयंती निमित्त अस्वलअंबा येथील नामा नाईक तांडा येथे हनुमान मंदिर व सभा मंडप भूमिपूजन सोहळा भव्य दिव्य स्वरूपात आमचे आदरणीय बंधू श्रीकृष्ण ढाकणे व गोविंद पांडुरंग ढाकणे यांच्या संकल्पनेतून कै.पांडुरंग ढाकणे यांच्या स्मरणार्थ पार पडला. काही चांगल्या गोष्टी घडण्यासाठी वेळ व काळ एकत्र येण्याची गरज असते तब्बल 40 वर्षानंतर अस्वलअंबा नगरीत ती वेळ आलेली आहे.**

**श्रीकृष्ण व गोविंद ढाकणे आळंदी येथील उद्योगपती आळंदी येथे जाऊन स्वकर्तृत्वावर भव्य असा व्यवसाय निर्माण केला.**

**'' घार उडे आकाशी पण चित्त तिचे पिल्लापाशी ''**

या उक्तीप्रमाणे दोन्ही बंधूंचे शरीर आळंदीत असले तरी मन मात्र आपल्या जन्मभूमीकडे लागलेले असते. आपण ज्या मातीत खेळलो बागडलो तिचे आपल्याला काही देणे लागते या संकल्पनेतून गेल्या पाच वर्षात अस्वलअंबा नगरीचा कायापालट या उद्योगपती बंधूंनी केला, अनेक समाज उपयोगी कामे केली. विशेष म्हणजे आपण केलेले कार्य या हाताचे त्या हाताला कळू देऊ नये असा स्वभाव दोघांचाही आहे. स्तुती केलेली दोघांनाही जमत नाही परंतु केलेले कार्य सर्वांना समजले पाहिजे त्याचा आदर्श सर्वांनी घेतला पाहिजे व आपल्या जन्मभूमीचे उपकार फेडण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे.

श्रीकृष्ण व गोविंद यांनी गावांमध्ये विठ्ठल रुक्माई चे मंदिर निर्माण करून भव्य असा 50 बाय 200 सभामंडप उभा केला यामुळे गावातील गोरगरीब यांना लग्न सोहळा व इतर कार्यक्रमास लागणारा मंडपाचा सरासरी 50 हजार रुपये खर्च वाचवण्याचे काम यांनी केले.

वरील कामाबरोबरच गावातील प्रत्येक कन्येच्या म्हणजे प्रत्येक समाजातील कन्येच्या विवाह सोहळ्यास अकरा हजार रुपये 11000/- कन्यादान म्हणून देण्याचा निर्णय गेल्या चार वर्षापासून पूर्ण करत आहेत .

अस्वलअंबा गावामध्ये विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर उभा केले भव्य असा सभागृह निर्माण केला एवढ्यावरच न थांबता आषाढी एकादशी निमित्त भव्य अशी तीन दिवसीय जत्रा *भरवण्याचे कार्य हे बंधू पार पाडत आहेत. हा जत्रेचा सोहळा एवढा भव्य दिव्य होत आहे की अवघे पंढरपूर अस्वलंबानगरीत अवतरते. गावातील सर्व लेकी या जत्रेला माहेरी येतात जत्रेमध्ये मोठ मोठे राखपाळणे लहान मुलांना खेळण्यासाठी विविध खेळ सर्व दुकाने येतात तीन दिवस हा मेळावा चालतो याचे पूर्ण श्रेय यांचेच.

अस्वलअंबा गावातील मंदिर व जिल्हा परिषद शाळेसमोरील परिसर वृक्षारोपण करून रमनीय बनवला आहे तसेच व्यायाम करता यावा म्हणून जिम सुद्धा उभा केली आहे लहान मुलांना खेळण्यासाठी झोपाळा निर्माण केला आहे. हे सर्व करत असतानाच सर्वांशी हसत खेळत राहून लहानापासून थोरापर्यंत दांडगा जनसंपर्क आहे प्रत्येकाच्या सुखदु:खात सामील होण्याचा प्रयत्न करतात .

स्वतःचा वाढदिवस प्रत्येक जण हॉटेलमध्ये जाणे जेवण करणे केक कापणे व एखाद्या हिल स्टेशनला जाऊन साजरा करतात परंतु आमचे बंधू स्वतःचा वाढदिवस अस्वलअंबा जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना नवीन कपडे व शैक्षणिक साहित्य देऊन साजरा करतात तसेच वर्षभरात शैक्षणिक सहल ज्या ठिकाणी जाईल त्या ठिकाणी घडेल तशी मदत करतात.

आमच्या बंधूंच्या प्रत्येक कार्यास अस्वलअंबा गावकऱ्यांच्या वतीने मोलाचे सहकार्य लाभते. सर्वजण आनंदाने बहुसंख्येने प्रत्येक कार्यात सामील होतात व मदत करतात.

यामुळेच श्रीकृष्ण पांडुरंग ढाकणे व गोविंद पांडुरंग ढाकणे हे असलांबा गावासाठी लाभलेले एक परीस आहेत. सर्व अस्वलअंबा गावातील रहिवाशांच्या वतीने दोघांचे मनःपूर्वक आभार धन्यवाद!

**दत्ताजी ढाकणे, ग्राम पंचायत सदस्य, अस्वलअंबा**

## लोकरंजन




# सिनेरंग : सासू-सुनेच्या नात्यावर आधारित मनोरंजक 'कप बशी'

सासू-सुनेचं नातं हे एव्हरग्रीन असतं. या नात्यामध्ये प्रेम, आदर, राग, रुसवे फुगवे अशा वेगवेगळ्या भाव-भावना असतात. याच नात्यातली एक वेगळी गोष्ट आता "कप-बशी" या आगामी चित्रपटात पाहता येणार आहे. वैभव चिंचाळकर दिग्दर्शित हा चित्रपट ५ जूनला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून, या चित्रपटाचं पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर लाँच करण्यात आलं.

सुकल्प चित्र या निर्मिती संस्थेने "कप बशी" या चित्रपटाची निर्मिती केली असून कल्पक सदानंद जोशी हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. चित्रपटात अभिनेत्री निर्मिती सावंत, पूजा सावंत अभिनेता ऋषी मनोहर, नयना आपटे, अनंत जोग, राहुल रानडे,आनंद इंगळे, चिन्मय शिंत्रे, पूर्णिमा तळवलकर, आनंद काळे अशी तगडी स्टारकास्ट असल्यामुळे उत्तम अभिनयाची मेजवानी या चित्रपटातून प्रेक्षकांना मिळणार आहे यात शंका नाही. अरूण आणि अरूणा हे दांपत्य त्यांच्या मुलाच्या लग्नासाठी मुलगी शोधत असतात. परंतु अरूणा यांच्या अध्यात्मिक गुरूनं सूनेबाबत काही अटी सांगितल्या आहेत. त्या अटींनुसार अरूणा मुलगी शोधत असतात. त्यांना तशीच मुलगी सापडते का? नक्की अशी कोणती अट आहे? त्यांचे पुढे लग्न जुळत की नाही? अशा धमाल आशयसूत्रावर "कप बशी" हा चित्रपट आधारित आहे.




# 'राजा शिवाजी' फर्स्ट लूक आता डिजिटलवर

जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित 'राजा शिवाजी' या बहुप्रतिक्षित चित्रपटाचा 'फर्स्ट लूक टीझर' अखेर डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला आहे. नुकताच 'धुरंधर: द रिव्हेंज' या चित्रपटासोबत चित्रपटगृहांमध्ये विशेषरीत्या प्रदर्शित करण्यात आलेल्या या टीझरला थिएटरमध्ये टाळ्या आणि जल्लोषाचा प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. सोशल मीडियावरही प्रेक्षकांनी टीझर बद्दल प्रतिक्रिया दिल्या होत्या. आता हाच टीझर डिजिटल माध्यमातून प्रदर्शित होतो आहे, भारताच्या सर्वश्रेष्ठ महान अश्या राजाची भव्य झलक अधिक व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचत असून, चित्रपटाबाबतची उत्सुकता अधिकच वाढली आहे.'राजा शिवाजी' हा चित्रपट छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असून त्यांच्या पराक्रम, स्वाभिमान आणि स्वराज्य स्थापनेच्या प्रेरणादायी प्रवासाचे भव्य चित्रण यात करण्यात आले आहे. अभिनेता रितेश विलासराव देशमुख यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून मुख्य भूमिका देखील साकारली आहे. त्यांच्या दिग्दर्शनातून ऐतिहासिक विषयाला आधुनिक सिनेमॅटिक भव्यतेची जोड देण्याचा प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतो.


# म्हणून निर्मित सावंत यांनी 'सुपर डुपर'साठी मकरंद अनासपुरेंची मदत घेतली

**मराठी चित्रपटसृष्टीतील दमदार अभिनेत्री निर्मिती सावंत या पुन्हा एकदा त्यांच्या प्रभावी अभिनयाने प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेत आहेत. आगामी 'सुपर डुपर' या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये त्यांच्या तोंडी असलेला रांगडा लहेजा, संवादफेक आणि अस्सल गावाकडचा अंदाज प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरत आहे.या चित्रपटात त्या गावातील एका खंबीर बाईची भूमिका साकारत आहेत. ट्रेलरमध्येच त्यांच्या व्यक्तिरेखेची झलक पाहायला मिळते. घर सांभाळणारी, परिस्थितीशी झुंज देणारी आणि कुटुंबाच्या अस्तित्वासाठी उभी राहाणारी स्त्री. विशेष म्हणजे, या भूमिकेला अधिक वास्तववादी बनवण्यासाठी निर्मिती सावंत यांनी खास मेहनत घेतली आहे.**

**ग्रामीण भाषेचा नेमका फ्लेवर, रांगडेपणा आणि बोलीभाषेतील बारकावे अचूक साधण्यासाठी त्यांनी मराठी सिनेसृष्टीत स्वतःची एक खास शैली निर्माण करणाऱ्या अभिनेता मकरंद अनासपुरे यांची मदत घेतली. त्यांनी स्क्रिप्ट पाठवून त्यांच्याकडून भाषेतील शब्द, वाक्प्रचार आणि लहेजा समजून घेतला, ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखेला खरेपणाची जोड मिळाली. ट्रेलरमध्ये दिसतंच आहे की त्या एका गावाकडच्या बाईची भूमिका साकारत आहेत.त्याचं आयुष्य, जगणं हे खूप वास्तव आहे. भाषेचा आणि लहेजाचा अचूकपणा यासाठी त्यांनी मकरंद अनासपुरेशी संपर्क साधला.मकरंद त्याच भागातला असल्यामुळे, त्याच्या मार्गदर्शनामुळे त्या बोलीचा रांगडेपणा आणि नैसर्गिकपणा मला समजला.**



# टेलीरंग : मनोरंजनाचा पॉवर-प्ले, झी मराठीवर मालिकांमध्ये नवा सामना सुरु!




क्रिकेट म्हटलं की मैदानावर चौकार-षटकारांचा वर्षाव, तणावपूर्ण सामने हा थरार ठरलेला असतो. आता हाच थरार प्रेक्षकांना आपल्या आवडत्या मालिकांमध्येही अनुभवायला मिळणार आहे.हो हे खर आहे कारण झी मराठीवर सुरु होतोय मनोरंजनाचा पॉवर-प्ले. झी मराठी घेऊन येत आहे मनोरंजनाचा "पॉवर-प्ले" ! या "पॉवर-प्ले" मध्ये प्रत्येक मालिकेत नवे ट्विस्ट, अनपेक्षित वळणं आणि रोमहर्षक घडामोडी प्रेक्षकांना खिळवून ठेवणार आहेत. 'सावळ्याची जणू सावली' मालिकेत नात्यांची नवी कसोटी पाहायला मिळेल, तर 'वीण दोघातली ही तुटेना' मध्ये भावनांचा संघर्ष अधिक तीव्र होणार आहे. 'लक्ष्मी निवास' मध्ये घरातील सत्तासंघर्ष रंगणार असून 'कमळी'मध्ये कमळीच्या आयुष्यात मोठा टर्निंग पॉइंट येणार आहे. 'तुला जपणार आहे' मध्ये रहस्य अधिक गहिरे होणार, तर 'तारिणी' मध्ये प्रेम आणि जबाबदारी यांचा खरा कस लागणार आहे. 'शुभ श्रावणी'मध्ये नात्यांची गुंतागुंत नव्या रूपात समोर येईल, प्रत्येक मालिकेतली ही चुरस आणि आपल्या आवडत्या पात्रांचे चौकार षटकार यांनी मालिकेतील हा सामना नक्कीच रंगतदार होणार यात शंका नाही. झी मराठीवरील या लोकप्रिय मालिका जिथे प्रत्येक पात्र आपापल्या पद्धतीने खेळी करताना दिसणार आहे.

**संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# सिरसाळा सरपंचपद पोटनिवडणुकीचे बिगुल वाजले; 'मेवा' लाटणारा नको तर 'सेवा' करणारा सरपंच हवा!

**सिरसाळा/अतुल बडे**

परळी तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची समजल्या जाणाऱ्या सिरसाळा ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. या रिक्त पदासाठी आता राजकीय हालचालींना वेग आला असून, अनेक इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी कंबर कसली आहे. विशेष म्हणजे, यावेळची निवडणूक पक्ष किंवा जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन केवळ 'विकासाच्या व्हिजन'वर लढली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सरपंचपद ओबीसी (OBC) प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने या प्रवर्गातील हिंदू आणि मुस्लिम समाजातील अनेक दिग्गज इच्छुक सक्रिय झाले आहेत. आपला पत्ता निश्चित करण्यासाठी अनेकांनी नेत्यांकडे 'फिल्डिंग' लावण्यास सुरुवात केली आहे. गावातील पारावर, हॉटेलमध्ये सध्या 'चाय पे चर्चा' रंगत आहे, तर काही ठिकाणी मतदारांना आकर्षित करण्यासाठी छुप्या मार्गाने पार्ट्यांचेही आयोजन केले जात असल्याचे चित्र आहे. सरपंचपदाचा कार्यकाळ केवळ दीड वर्षाचा शिल्लक असला, तरी गावच्या सत्तेची खुर्ची मिळवण्यासाठी अनेकांनी प्रतिष्ठा पणाला लावली आहे. मात्र, यावेळी जनतेचा सूर काहीसा वेगळा आहे. "ज्याची जनतेसोबत वागणूक चांगली आहे आणि ज्याच्याकडे गावच्या विकासाचे स्पष्ट व्हिजन आहे, त्यालाच कौल दिला जाईल," अशी भूमिका सुज्ञ मतदारांनी घेतली आहे."निवडणुकीत मोठी आश्वासने देऊन नंतर गावचा आणि जनतेचा निधी हडप करणाऱ्यांना आता जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे," अशा तीव्र भावना सिरसाळावासीय व्यक्त करत आहेत.




### निवडणुकीचे मुख्य मुद्दे आणि गावच्या समस्या:

- **रस्ते आणि नाल्यांची दुरावस्था:** मुख्य रस्त्यांची चाळण झाली असून नाल्या तुंबल्याने घाणीचे साम्राज्य पसरले आहे.
- **पिण्याच्या पाण्याचा प्रश्न:** गावात पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर झाला असून महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.
- **निकृष्ट कामे:** सरकारी योजनेतील कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

# माकपचा पाठपुराव्याने वीज प्रश्न मिटला मोहासह गावखेड्यातील अडचणी दूर

**परळी / प्रतिनिधी**



मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या प्रयत्नातून अखेर महावितरण मार्फत परळी तालुक्यातील मोहा येथे उच्च कार्यक्षमतेचा 10 एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला असून यामुळे मोहा गाव परिसरातील विजेच्या तुटवड्यावर यामुळे मात होणार आहे.

मोहा सब स्टेशन अंतर्गत असलेल्या गाव खेड्यातील विजेच्या संदर्भात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे अनेक वेळा आंदोलने, निवेदने देऊन हा प्रश्न ऐरणीवर आणला. मोहा गावासह परिसरातील कान्नापूर, मुंगी, देवठाणा, जैतापूर, त्याचबरोबर बोधेगाव, म्हातारगाव, कावळ्याची वाडी, इत्यादी गावांचा देखील भार या सब स्टेशनवर असल्याने वारंवार वीज पुरवठा विस्कळीत होत असल्याने उच्च क्षमतेचे सयंत्र बसविण्यात यावी या मागणी करिता माकप मोहा शाखेने अनेक वेळा महावितरण कार्यालयासमोर आंदोलने केली, निवेदने दिले. माकपच्या या लढ्याला अखेर यश आले असून मोहा सब स्टेशन या ठिकाणी 10 एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले असून यामुळे कान्नापूर व बोधेगाव येथील 11 केव्ही लाईनवरील अतिरिक्त भार कमी होण्यास मदत मिळून अधिकचा फायदा शेतकरी व नागरिकांना होणार आहे. माकप शाखा मोहा या लढ्यासाठी शाखा कॉ.प्रवीण देशमुख, कॉ.विशाल देशमुख, कॉ.सुदाम शिंदे, कॉ.इस्माईल शेख, कॉ.कुमार महाजन, कॉ.दत्ता कांबळे, कॉ.वैजनाथ पाळवडे, कॉ.विश्वाबर वाघमारे, कॉ.विष्णू देशमुख आदींसह गावकऱ्यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला.

# पत्रकारावर खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या ठाणेदारांवर निलंबनाची कारवाई करा




## महागाव तालुका पत्रकार संघाचा आंदोलनाचा इशारा

**महागाव | प्रतिनिधी**

लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांवर यवतमाळ जिल्ह्यात पोलीस प्रशासनाकडून सूडबुद्धीने कारवाई होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. उमरखेडचे ठाणेदार शंकर पांचाळ यांनी पत्रकार अमित देशमुख यांच्यावर दाखल केलेल्या गुन्ह्याचा निषेध करत, महागाव तालुका पत्रकार संघाने तहसीलदार महागाव यांच्यामार्फत जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन ठाणेदारांवर निलंबन करून फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे.

उमरखेड येथील 'धाडस 007 न्यूज' चॅनलचे पत्रकार अमित देशमुख यांनी उमरखेड तालुक्यातील अवैध धंद्यांचे पितळ पुराव्यासह उघडे पाडले होते. या बातम्यांमुळे संतप्त झालेल्या ठाणेदार शंकर पांचाळ यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करत पत्रकार देशमुख यांच्यावर आयपीसी ३५३ (सरकारी कामात अडथळा) व बीएनएस अंतर्गत खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. ही कारवाई निव्वळ सूडबुद्धीने आणि अवैध धंदेवाल्यांना पाठबळ देण्यासाठी केल्याचे पत्रकारांचे म्हणणे आहे.

"जर पत्रकाराने खरोखरच सरकारी कामात अडथळा आणला असेल, तर त्यावेळचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी तात्काळ सार्वजनिक करावे," अशी मागणी पत्रकार संघाने करून सदर फुटेज समोर आल्यास ठाणेदारांचा खोटेपणा उघड होईल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे. केवळ स्वतःचे अपयश झाकण्यासाठी एका पत्रकाराचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न असल्याचा संताप व्यक्त होत आहे. ठाणेदार शंकर पांचाळ यांना तातडीने निलंबित करून त्यांची सीआयडी चौकशी व्हावी, पत्रकार अमित देशमुख यांच्यावर दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत.,अवैध धंद्यांना संरक्षण देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली..

या निवेदनाद्वारे प्रशासनाला स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, जर दोषी ठाणेदारावर ठोस कारवाई झाली नाही, तर महागाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व पत्रकारांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडले जाईल. पत्रकारांच्या सन्मानाला धक्का लागल्यास निर्माण होणाऱ्या जनक्षोभाला पोलीस प्रशासनच जबाबदार असेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सदर निवेदन नायब तहसीलदार गजानन पराते,पुरवठा निरीक्षक मोहन कोल्हे यांनी स्विकारले.

या निवेदनावर महागाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश कामारकर,उपाध्यक्ष किरण नरवाडे,सचिव रमेश देशमुख,मार्गदर्शक रितेशभाऊ पुरोहित,माजी अध्यक्ष संतोष जाधव, रवि कावळे,संजय पाटे,विजय सुर्यवंशी,निलेश नरवाडे,विशाल डहाळे,शेरखान पठाण,संजय नरवाडे,अशोक राऊत ,विलास गावंडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बीड सायबर पोलिसांची मोठी कारवाई

## डिजिटल अरेस्ट फसवणूक प्रकरणातील तीन आरोपी अटकेत

**बीड | प्रतिनिधी**



सायबर गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी बीड सायबर पोलिसांनी मोठी कारवाई करत "डिजिटल अरेस्ट" या नावाखाली फसवणूक करणाऱ्या टोळीतील तीन आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणात तब्बल 23,42,888 रुपयांची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे.

सायबर पोलीस ठाणे बीड येथे दाखल गुन्ह्यानुसार, परळी येथील तक्रारदार सूर्यकांत निवृत्ती मुंडे यांना "डिजिटल अरेस्ट"चा धाक दाखवून ऑनलाइन पद्धतीने मोठी रक्कम उकळण्यात आली होती. या प्रकरणी भारतीय न्यायसंहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

■ **रोख रक्कम व बँक व्यवहार जप्त-**

तपासादरम्यान आरोपींकडून 3 लाख रुपये रोख जप्त करण्यात आले असून, 3.20 लाख रुपये बँक खात्यांमध्ये गोठवण्यात आले आहेत. आरोपी ऑनलाइन ट्रेडिंगच्या माध्यमातून फसवणुकीची रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापरत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या गुन्ह्यात आणखी काही आरोपी सहभागी आहेत का, तसेच इतर किती लोकांची फसवणूक झाली आहे याचा सखोल तपास सुरू आहे.

बीड जिल्हा पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, "डिजिटल अरेस्ट"सारख्या खोट्या धमक्यांना बळी पडू नये. पोलीस कधीही व्हिडिओ कॉलद्वारे अटक करत नाहीत. अशा प्रकारचा कॉल आल्यास त्वरित 1930 या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदवावी.

■ **तांत्रिक तपासातून आरोपींचा शोध-**

सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि डिजिटल पुराव्यांच्या आधारे आरोपींचा माग काढत जळगाव येथून त्यांना अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत:

प्रसन्न अजय कासट (वय 31)
स्वाती प्रसन्न कासट (वय 26)
संकेत दीपक बेलदार (वय 22)

ही कारवाई पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

# मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीच्या सर्व संघटनांची शुक्रवारी परळीत व्यापक बैठक

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीच्या सर्व संघटनांची शुक्रवारी (दि. 3 एप्रिल) रोजी परळीत व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत दोन्ही जमातीतील ज्येष्ठ पदाधिकारी, नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांचा सत्कार होणार आहे. यावेळी समाजाच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधून त्या मार्गी लावण्यासाठी पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार आहे. बैठकीला समाजबांधवांनी. ओठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



विभागातील महादेव कोळी, मल्हार जमातीच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी (जात वैधता प्रमाणपत्रे समितीमार्फत पूर्वीप्रमाणे कोळी नोंदी वरून विना अट देण्यासाठी) विचारविनिमय व सर्वानुमते चर्चेअंती मराठवाडा स्तरावर आंदोलनाची रूपरेषा ठरवण्यासाठी परळी वैजनाथ येथे दिनांक 3 एप्रिल 2026 शुक्रवार रोजी सकाळी 11 वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात होणाऱ्या या बैठकीत एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मराठवाडा स्तरावर छत्रपती संभाजीनगर येथे महादेव कोळी, मल्हार जमातीच्यावतीने प्रत्येक तालुक्यातील बांधवांना सोबत घेऊन शिस्तबद्ध आमरण उपोषण/ साखळी उपोषण/ साखळी धरणे (जे सर्वांच्या विचाराने ठरेल ते) आंदोलन करण्याबाबत विचारविनिमय करून ठरवणे.




# 'बहिष्कृत भारत' – समतेच्या क्रांतीचा बुलंद आवाज

२ एप्रिल १९२७ हा दिवस भारताच्या पत्रकारितेच्या आणि सामाजिक चळवळीच्या इतिहासातील एक सुवर्णक्षण आहे. याच दिवशी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बहिष्कृत भारत' या पाक्षिकाचे पहिले पाऊल टाकले. 'मूकनायक' नंतर सुरू झालेले हे वृत्तपत्र केवळ कागदाचा तुकडा नव्हते, तर ते शोषितांच्या संघर्षाचे अस्त्र आणि अन्यायाविरुद्ध पेटलेली मशाल होती.

'बहिष्कृत भारत'ची निर्मिती एका विशिष्ट ऐतिहासिक कालखंडात झाली. जेव्हा अस्पृश्य समाजावर अमानवीय बंधने होती आणि मुख्य प्रवाहातील माध्यमे या वर्गाच्या प्रश्नांवर मौन बाळगून होती, तेव्हा बाबासाहेबांनी या 'मूक' समाजाला बोलके करण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी हे विचारपीठ निर्माण केले.

या वृत्तपत्राच्या माध्यमातून बाबासाहेबांनी सनातनी विचारसरणीवर कठोर प्रहार केले. त्यांचे अग्रलेख हे केवळ वैचारिक नव्हते, तर ते पुराव्यांसह केलेले तार्किक विश्लेषण असे. 'बहिष्कृत भारत'च्या शीर्षकाखाली त्यांनी संत ज्ञानेश्वरांचा एक अभंग छापला होता:

"आता तरी पुढे हाचि उपदेश ।
नका करू नाश आयुष्याचा ॥"

या ओळींमधून त्यांनी समाजाला आत्मसन्मानाने जगण्याचा आणि वेळ वाया न घालवता संघटित होण्याचा संदेश दिला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह असो किंवा काळाराम मंदिर प्रवेश, या सर्व संघर्षांची वैचारिक मांडणी 'बहिष्कृत भारत'ने अत्यंत प्रभावीपणे केली.

डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता ही केवळ माहिती देण्यासाठी नव्हती, तर ती 'सामाजिक परिवर्तनाचे साधन' होती. त्यांनी या वृत्तपत्रातून समाजाला केवळ त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून दिली नाही, तर त्या अन्यायाविरुद्ध कायदेशीर आणि सनदशीर मार्गाने कसे लढायचे, याचे दिशादर्शनही केले.

आजच्या काळात, जेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि उपेक्षितांचे आवाज दबले जाण्याची भीती व्यक्त केली जाते, तेव्हा 'बहिष्कृत भारत'चा वारसा अधिक महत्त्वाचा ठरतो. सत्य मांडण्यासाठी लागणारी निर्भीडता आणि अभ्यासू वृत्ती आजच्या पत्रकारितेने बाबासाहेबांच्या या कार्यापासून शिकण्यासारखी आहे.

'बहिष्कृत भारत'ने अन्यायाची साखळी तोडून समतेच्या नव्या युगाची पहाट केली. आज या ऐतिहासिक घटनेला अनेक वर्षे उलटली असली, तरी त्यातील विचार आजही तितकेच जिवंत आणि मार्गदर्शक आहेत. आपल्या हक्कासाठी जागृत राहणे आणि संविधानाने दिलेल्या मूल्यांचे रक्षण करणे, हीच खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आणि त्यांच्या 'बहिष्कृत भारत' या कार्याला दिलेली खरी मानवंदना ठरेल.

**– डॉ.सिद्धार्थ तायडे**

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
बीड, शुक्रवार ३ एप्रिल 2026

# मातोश्री विद्यालय महागावच्या दोन संघांची राज्यस्तरावर झेप

**महागाव प्रतिनिधी**

शालेय शिक्षण विभाग व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित विभाग स्तरीय वयोगट 17 19 च्या थ्रो बॉल संघात मुली मुलांच्या संघाने आपली खेळ कौशल्य प्रदर्शित करून विभागीय सामन्यात आपले स्थान पक्के केले राज्यस्तरावर आपली छाप पाडली. या खेळामध्ये खेळाडू ओम गावंडे कर्णधार वयोगट सतरा वर्षे कृष्णा वळसे, साहिल खोसे, रुद्रवीर राऊत, शिवा नेवारे, श्रीकृष्ण गावंडे, गौरव आखाडकर, गौरव गावंडे, सोहम पतके, पवन राऊत, सोहम राऊत, रोहित वानखेडे, या संघाने कार्य कुशलता व चेंडूची झेल अतिशय चुरशीने प्रदर्शित करून राज्यस्तरावर आपली झेप कायम केली . 19 वर्षे वयोगट संघाची कर्णधार म्हणून पल्लवी पहुरकर, प्रगती पहुरकर, जान्हवी नरवाडे, साक्षी कदम ,रोहिणी कदम, सानिका राऊत, उन्नती घोडे ,रोशनी घोडे, तेजस्विनी चव्हाण ,प्रशांती नरवाडे, समृद्धी कदम ,श्रुतिका येनकर यांचा समावेश होता या संघाची वाशिम अमरावती अकोला या संघाचा बॉल अचूक झेल करून आपल्या धुरंधर खेळाने यश संपादन केले व आपली राज्यस्तरासाठी निवड निश्चित केली. संघाचे सर्वत्र कौतुक होत असून खेळाडूंचे संस्थेच्या वतीने व कर्मचारी वृंदाच्या वतीने स्वागत करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.



## खोलेश्वरच्या प्रगती विभागात शिशुवाटिकेतील चिमुकल्यांचा बक्षीस वितरण उत्साहात

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

खोलेश्वर प्राथमिक विद्यालय (प्रगती विभाग) शिशुवाटिकेतील चिमुकल्यांचा बक्षीस वितरण कार्यक्रम ०२ मार्च गुरूवार रोजी संपन्न झाला.

अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विष्णू सोनवणे होते.यावेळी विभाग प्रमुख वर्षा मुंडे, शिशुवाटिका प्रमुख कल्याणी देशपांडे, मनिषा खोगरे उपस्थित होत्या. या प्रसंगी बोलताना वर्षा मुंडे म्हणाल्या की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम भा.शि.प्र.संस्था करते शिवाय या संस्थेतूनच त्यांचा व्यक्तिमत्व विकास होण्याच्या उद्देशाने शिशु वाटीके पासूनच प्रयत्न केले जातात. या शिशुवाटिकेतील चिमुकले ही सर्वच क्षेत्रात चमकदार यश प्राप्त करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विष्णु सोनवणे म्हणाले की, आपल्या संस्थेचे, विद्यालयाचे, पालकाचे नाव सर्वदुर पर्यंत पोहंचविण्याकरिता विद्यार्थ्यांनी मनःपूर्वक खुप अभ्यास करावा आणि यशस्वी व्हावे आपल्याला मिळणारे यश हे पुढील काळात प्रेरणा देणारे असून स्वतःच्या प्रगतीसाठी दिशादर्शक आहे.लहान



वयातच जीवनावर चांगले संस्कार करता येतात व हे संस्कार मुलांना कायमस्वरूपी लक्षात राहतात याच संस्कारामुळे जीवनात चांगला व्यक्ती बनता येते असेही ते म्हणाले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना भेटवस्तु देण्यात आली. संपुर्ण कार्यक्रमाचे नियोजन कल्याणी देशपांडे,मनिषा खोगरे यांच्यासह इतरांनी केले या कार्यक्रमास शिक्षिका,शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

## सिटीईटी उत्तीर्ण शिक्षिकेंचा सत्कार
### विद्यार्थी नव्हे तर कर्मचारी ही गुणवत्ताधारक

**परळी / प्रतिनिधी**

महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलीत महाराष्ट्र प्राथमिक विद्यालयाच्या दोन महिला शिक्षिकांनी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सी.बी.एस.ई.), नवी दिल्ली यांच्या वतीने ७ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत (सी.टी.ई.टी.) सुयश संपादन केले आहे. या दैदिप्यमान यशाबद्दल शाळेच्यावतीने त्यांच्या हृदयपूर्वक सत्कार करण्यात आला.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांव्ये प्राथमिक शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असल्याच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील आदर्श शाळा म्हणून सर्वदूर ख्याती असलेल्या महाराष्ट्र प्राथमिक विद्यालयाच्या श्रीमती सुनंदा श्रीमंत फड व श्रीमती प्रांजली राधाकृष्ण लुगडे या दोन महिला कर्मचारी यांनी कसल्याही प्रकारची शिकवणी न लावता दैनंदिन शालेय कामकाज पूर्ण करत स्वयं अध्ययन करून पहिल्याच प्रयत्नात ही




परीक्षा देत यशस्विता प्राप्त केली आहे. विशेष बाब म्हणजे श्रीमती सुनंदा फड ह्या संगीत विशारद असून त्या राज्य सरकारच्या शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) देखील उत्तीर्ण झालेल्या आहेत. सी.टी.ई.टी. या सारख्या केंद्र स्तरावरील शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल या दोन्ही महिला कर्मचारी यांचा सत्कार महाराष्ट्र प्राथमिक विद्यालयात संपन्न झाला. या सत्कार सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्र माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक मुरलीधर बोराडे, महाराष्ट्र प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक विजय गणगे यांच्यासह माध्यमिक व प्राथमिक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## बदलापूर ते नवी मुंबई थेट लोकलचा प्रस्ताव

**बदलापूर प्रतिनिधी**

बदलापूर येथून थेट नवी मुंबईपर्यंत लोकल सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने मोठी हालचाल सुरू झाली आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नव्या रेल्वे मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे आदेश दिल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. सध्या बदलापूरहून नवी मुंबईला जाण्यासाठी प्रवाशांना ठाणे येथे बदल करून हार्बर मार्गाने प्रवास करावा लागतो. यामुळे वेळ आणि गर्दी दोन्ही वाढतात. नव्या प्रकल्पामुळे हा त्रास कमी होणार आहे. या प्रस्तावानुसार बदलापूर आणि वांगणीदरम्यान कासगाव येथे नवीन रेल्वे स्थानक उभारण्याची योजना असून, तेथून नवी मुंबईतील कामोठेपर्यंत नवीन मार्ग विकसित करण्याचा विचार आहे. या प्रस्तावालाही तत्त्वतः मान्यता देण्यात आली असून प्रकल्प अहवाल तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे समजते. विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. दरम्यान, स्थानिक स्तरावरूनही या मागणीसाठी पाठपुरावा करण्यात आला होता. आता रेल्वे मंत्रालयाच्या आदेशानंतर या प्रकल्पाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.




## नवी मुंबईत ‘इस्रो शास्त्रज्ञ’ बनून फसवणूक; महिलांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून लाखोंची लूट

**नवी मुंबई वृत्तंस्था**

स्वतःला इस्त्रो शास्त्रज्ञ असल्याचे भासवून उच्चभ्रू महिलांची फसवणूक करणाऱ्या एका भामट्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. प्रेमसंबंधांच्या आमिषाने महिलांना जाळ्यात ओढत आर्थिक आणि लैंगिक शोषण केल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे.

**बनावट ओळख, मोठ्या पदांचा दावा**

मिळालेल्या माहितीनुसार, आदर्श म्हात्रे नावाचा आरोपी मूळचा नवी मुंबईतील असून तो केवळ दहावीपर्यंत शिक्षित आहे. मात्र, लग्न जुळवणाऱ्या ॲप्स आणि संकेतस्थळांवर बनावट प्रोफाइल तयार करून तो स्वतःला कधी इस्त्रोचा शास्त्रज्ञ, तर कधी सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवत होता. या खोट्या ओळखीच्या जोरावर तो महिलांशी संपर्क साधत विश्वास संपादन करत होता.

**प्रेमाचे आमिष, पैशांची उकळपट्टी**

आरोपी उच्चशिक्षित आणि सुस्थितीत असलेल्या महिलांना लक्ष्य करत असे. डॉक्टर, इंजिनिअर, बँक अधिकारी अशा महिलांना लग्नाचे आश्वासन देत तो जवळीक वाढवत होता. त्यानंतर भावनिक गुंतवणूक वाढल्यावर विविध कारणे सांगून त्यांच्याकडून लाखो रुपये उकळत असल्याचे तपासात समोर आले आहे.

**अनेक शहरांतील महिलांना जाळ्यात ओढले**

ही फसवणूक केवळ नवी मुंबईपुरती मर्यादित नसून ठाणे, मुंबई, पिंपरी चिंचवड, नागपूर आणि यवतमाळ या भागांतील महिलांनाही त्याने आपल्या जाळ्यात ओढल्याचे समोर आले आहे. एका महिलेकडून घेतलेले पैसे दुसऱ्या महिलेसमोर श्रीमंती दाखवण्यासाठी वापरण्याची पद्धत तो वापरात होता.

**पोलीस तपासात उघडकीस आला प्रकार**

संशयाच्या आधारे पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याचा हा संपूर्ण कारनामा समोर आला. अनेक महिलांनी बदनामीच्या भीतीने तक्रार देण्यास कचरल्याचेही समोर आले आहे.पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, ऑनलाइन ओळखी करताना व्यक्तीची पूर्ण खातरजमा करावी. कोणालाही बँक किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये. फसवणूक झाल्यास न घाबरता तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.

## विवोचा व्ही70 एफई स्मार्टफोन २ एप्रिलला होणार लाँच

**मुंबई :** विवो कंपनीनं आपल्या व्ही70 सिरीज अंतर्गत व्ही70 एफई हा नवीन स्मार्टफोन भारतात लाँच करण्याची अधिकृत घोषणा केली असून हा फोन २ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ वाजता सादर केला जाणार आहे. मिड-रेंज सेगमेंटमध्ये येणाऱ्या या फोनमध्ये दमदार कॅमेरा, मोठी बॅटरी आणि आधुनिक फीचर्स दिल्यामुळे सर्वसामान्य वापरकर्त्यांसाठी हा एक आकर्षक पर्याय ठरण्याची शक्यता आहे. कंपनीनं आधीच या फोनसाठी टीझर आणि मायक्रोसाइट सुरू केली असून, फोनचा फोकस ऑल-डे परफॉर्मन्स आणि यूजर-फ्रेंडली डिझाइनवर असल्याचं स्पष्ट केलं आहे.

व्ही70 एफई हा स्मार्टफोन भारतात ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होणार असून अमेझॉन आणि फ्लिपकार्ट यांसारख्या ई-कॉमर्स साइट्सवर त्याची विक्री होईल. तसेच विवोच्या अधिकृत स्टोअर्समधूनही हा फोन खरेदी करता येणार आहे. इंडोनेशियामध्ये आधीच लाँच झालेल्या या मॉडेलच्या भारतीय व्हर्जनमध्ये काही नवीन रंग पर्याय दिले जाण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे मॉन्सून ब्लू या रंगात ग्लो-इन-द-डार्क फिनिश देण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. या फोनची किंमत अंदाजे ३०,००० ते ४०,००० रुपयांच्या दरम्यान असू शकते. डिझाइन आणि डिस्प्लेच्या बाबतीत व्ही70 एफईमध्ये ६.८३ इंचाचा १.५के फ्लॅट अमोलेड डिस्प्ले दिला जाणार आहे. या डिस्प्लेमध्ये १२० हर्ट्झ रिफ्रेश रेट आणि १९०० निट्सपर्यंत पीक ब्राइटनेस मिळेल, ज्यामुळे वापरकर्त्यांना स्मूथ आणि ब्राइट व्हिज्युअल अनुभव मिळेल. एचडीआर१० प्लस सपोर्ट आणि ९४.४ टक्के स्क्रीन-टू-बॉडी रेशोमुळे व्हिडिओ पाहताना आणि गेमिंग करताना उत्कृष्ट अनुभव मिळेल. याशिवाय फोन आयपी६८ आणि आयपी६९ वॉटर आणि डस्ट रेसिस्टंट असल्यामुळे तो पाण्यातही सुरक्षित राहील. फोनमध्ये अंडर-डिस्प्ले फिंगरप्रिंट स्कॅनर आणि ड्युअल स्टिरिओ स्पीकर्ससारखी आधुनिक फीचर्सही देण्यात आली आहेत. कॅमेरा विभागात हा फोन विशेष लक्ष वेधून घेतो. यामध्ये २०० मेगापिक्सलचा मुख्य कॅमेरा देण्यात आला आहे, जो सॅमसंग एचपी५ सेन्सरवर आधारित आहे. या कॅमेरामध्ये ओआयएस आणि एफ/१.८८ अपर्चर असल्यामुळे कमी प्रकाशातही चांगले फोटो काढता येतात.